





दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १६६ ●सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955







# जिल्ह्यात सर्वत्र पाऊसाचा हा हा कार!

## एकूण १८ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याची नोंद



## गोदाकाठच्या ३२ गावांना सतर्कतेचा ईशारा

**गेवराई । प्रतिनिधी**

पैठण येथील जायकवाडी धरण जवळपास ९७ टक्के भरले असून अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यात सध्या पावसाचा जोर कमी झाला असला तरी पाण्याचा प्रवाह नगर आणि नाशिक जिल्ह्यातून सुरू असल्याने धरणातून गोदावरी नदीत १ लाख क्यूसेक पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे गोदावरी नदीला पूर आला असून नदी तीरावरील गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन येथे असलेले शनी मंदिर व पांचाळेश्वर येथील दत्त मंदिर पाण्याखाली गेले आहे. ३२ गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पैठण येथील जायकवाडी धरणातून शनीवारी रात्री १८ दरवाजे उघडून एक लाख क्युसेक पाणी सोडण्यात आल्याने गोदावरी नदी दुथडी भरून वाहत आहे. यामुळे पाचांळेश्वर येथील आत्मतिर्थ मंदिर, राक्षसभुवन येथील शनि महाराज मंदिर पाण्याखाली गेले आहेत. पाणीपातळी झपाट्याने वाढत असल्याने गोदावरी काठच्या गावांना प्रभारी तहसीलदार यांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. जायकवाडी धरणातून मोठा विसर्ग होत असल्याने गेवराई तालुक्यातील ३२ गावांत गोदावरी नदी दुथडी भरून वाहत आहे. यामुळे तिर्थक्षेत्र असलेल्या पांचाळेश्वर येथील आत्मतिर्थ दत्त मंदिर, राक्षसभुवन येथील शनि महाराज मंदिर पूर्णपणे पाण्यात गेले आहे. पाणीपातळी अधिक झाल्यास तालुक्यातील गुंतेगावं, बोरगांव, पाथरवाला, पांचाळेश्वर, राक्षसभुवन, सावळेश्वर, म्हाळसपिंपळगावं, नागझरी, खामगाव, आगरनादुंर, पांढरी, मिरगावं, पागुळगावं, राजापुर, रामपुरी, भोगलगावं आदि गावांना पाण्याचा वेढा पडू शकतो. यामुळे या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

### ● ३२ गावे १९वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत

**२००६ व २००७ साली जायकवाडी धरणातुन अडिच लाख क्युसेक पाणी गोदावरी नदी पात्रात सोडण्यात आले होते. त्यामुळे तालुक्यातील ३२ गावात पुराचे पाणी घुसल्याने नागरिकाचे स्थलांतर करण्यात आले होते. पुराने हजारो हेक्टर शेतीचे व घराचे मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर शासनाने या गावच्या पुनर्वसनाचे आश्वासन दिले होते. मात्र तब्बल १९ वर्षानंतरही या गावांचे पुनर्वसन झाले नाही. कोणत्याही लोक प्रतिनिधींनी याकडे लक्ष दिले नाही. यामुळे या ३२ गावातील नागरीक पावसाळ्यात जिव मुठीत घेऊन येथे राहतात.**

### ● गोदावरी नदिला आलेल्या पुराने राजापुर गावचा संपर्क तुटला

**गावातील महादेवाचे मंदिर, मारोती मंदिर, अंगणवाडीला पुराचा वेढा पडलेला आहे.तसेच राजापुर गावातुन बाहेर जाण्यासाठी असलेल्या एकमेव रस्त्यावर पाणी आल्याने गावातील लोकांना बाहेर पडता येत नसल्याने दळणवळण बंद होऊन गावाचा संपर्क तुटलेला आहे. मुख्य रस्त्यावरील कापशी नाल्यावरील पुलावरही पाणी असल्याने वाहतुक पुर्णपणे बंद झालेली आहे.त्यामुळे गावातील लोकांत भीतीचे वातावरण आहे. गेल्या अनेक वर्षापासुन या गावाचे पुनर्वसनाचा विषय शासन दरबारी असुन त्यावर निर्णय झालेला नसल्याने दरवर्षी या लोकांना पावसाळाभर जीव मुठीत घेऊनच जगावे लागते. वरुन येणारा पाऊस व वाढणार्या पाण्यामुळे लोक घाबरले असुन प्रशासनाकडून लोकांना धीर देण्याची गरज आहे.**

## अपहरण करून अल्पवयीन मुलीवर अत्याचार; तेलंगणातून आरोपी ताब्यात

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील १६ वर्षीय विद्यार्थिनीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या तरुणाला पोलिसांनी तेलंगणातून ताब्यात घेतले आहे. न्यायालयाने त्याला १५ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले असून पीडित मुलीची सुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे. ३० मे रोजी रात्री इयत्ता १२ वी शिकणारी पीडिता नातेवाईकांसह झोपलेली



असताना अज्ञाताने तिचे अपहरण केले. केज पोलिसात गुन्हा दाखल झाला होता. मात्र तीन महिन्यांपर्यंत

▶▶ उर्वरित पान २ वर

## तहसीलदार यांच्या निकालाने बीड मधील भूमाफीयांचे धाबे दणाणले

**बीड । प्रतिनिधी**

प्रकरणाची थोडक्यात हकीकत कि, गैरअर्जदार जाधव व कुरुळे यांनी बोगस कुळाचे प्रमाणपत्र हस्तगत करून मौजे तळेगाव येथील सर्वे नंबर १९ चे गट क्र. १५ ते २३ क्षेत्र १९ एकर २२ गुंठे व सर्वे क्र. २० चे गट क्र. २४ ते २९ मधील क्षेत्र २१ एकर ४ गुंठे जमीन स्वतःचे नावे हस्तांतरित करून घेतलेली होती, मयत गुलाबी किशन प्रसाद यांची नात अंजुम यांनी कुळाचे प्रमाणपत्र बोगस असल्याने व सदर वादग्रस्त जमीन वर्ग २ ची असताना वर्ग १



म्हणून बोगस नोंद सातबारा वरती करून घेतल्याने मा. तहसीलदार बीड यांचे कोर्टात प्रकरण क्रमांक २०२५/कुळ/कावी - ४०१२ दाखल केले, मा. तहसीलदार यांनी दोन्ही बाजूचे पक्षकारांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड रेल्वे स्थानकाची जिल्हा प्रशासन व रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात १७ सप्टेंबर २०२५ रोजी बीड ते अहिल्यानगर या मार्गावर पहिल्यांदच रेल्वे प्रत्यक्षात धावणार आहे. त्या अनुषंगाने रेल्वे आणि जिल्हा प्रशासनाची जय्यत तयारी सुरू आहे. त्याअनुषंगाने आज मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक दरम वीर मीणा आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड स्थानकाला प्रत्यक्ष भेट देवून पूर्वतयारीची पाहणी करत संबंधीताकडून सविस्तर आढावा घेतला. यावेळी पीसीएसटीईचे मनिंदर सिंग उप्पल, विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेशकुमार वर्मा, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, मुख्य अभियंता बी.के.सिंह, उपमुख्य अभियंता डी.डी.लोळगे,

▶▶ उर्वरित पान २ वर



## जिल्हा शिवसेना उबाठा गटाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविल्या बांगड्या व सिंदुर : जिल्हाप्रमुख गणेश वरेकर



**बीड । प्रतिनिधी**

पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार आज माझा देश माझ कूंकू या अभियानाअंतर्गत शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, ,महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका प्रमिलाताई माळी, जिल्हा संघटक ज्ञानेश्वर महाराज जाधव तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन , युवा सेना बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले,यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी सांगितले की पहलगाम हल्यात आमच्या माता भगिनी चे कुंकू पुसले व त्या विधवा झाल्या त्या मारेकऱ्यांना काय शिक्षा झाली ते सरकारने सांगावे ,एवढं होऊनही हे सरकार भारत पाकिस्तान क्रिकेट खेळायला परवानगी देत आहे याचा आम्ही

▶▶ उर्वरित पान २ वर

## लग्नाबाबत वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या लक्ष्मण हाकेंना अखेर मोठा दणका



**बीड । प्रतिनिधी**

राज्यात पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे, मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईमधील आंदोलनानंतर सरकारने राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात जीआर काढला, या जीआरला ओबीसी समाजाकडून प्रचंड विरोध होत आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण नको, स्वतंत्र आरक्षण द्या, अशी ओबीसी समाजाची भूमिका आहे. त्यामुळे या जीआरनंतर पुन्हा एकदा ओबीसी समाज आणि मराठा समाज आमने-सामने आल्याचं पहायला मिळत आहे. दरम्यान मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्ष नको अशी मागणी ओबीसी नेते लक्ष्मण हाके

▶▶ उर्वरित पान २ वर

### ●मनोज जरांगे पाटील यांची प्रतिक्रिया



**दरम्यान दुसरीकडे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी देखील लक्ष्मण हाके यांच्या या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला आहे. यावेळी बोलताना त्यांनी मंत्री छगन भुजबळ आणि आमदार धनंजय मुंडे यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. आतापर्यंत त्याच्यावर काही बोललो नाही, तुम्हाला आतापर्यंत बोललो नाही, लक्षात ठेवा, तुमच्या लेकीबाळी मी माझ्या लेकीबाळी प्रमाणे समजतो. अजित पवारांचे दोन कार्यकर्ते भुजबळ आणि धनंजय मुंडे यांना बोलता येत नसल्यानं त्यांनी हाकेला हाताखाली धरलं आहे, हाके हे भुजबळ आणि मुंडे यांची भाषा बोलत असल्याचा आरोप यावेळी जरांगे पाटील यांनी केला आहे. ते स्वत: हातानं वाद ओढून घेतात, हे आता धनगर समाजाला देखील कळालं आहे, त्यामुळे ते देखील त्यांना जवळ उभे करत नाहीत, असंही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं.**

## वडवणीत बोलेरो गाडीचा दरवाजा तोडून व्यापाऱ्याचे दीड लाख लंपास

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यामध्ये चोरीचे प्रकार काही केल्या कमी होत नाहीत. शुक्रवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास वडवणी येथील छत्रपती संभाजी महाराज चौकामध्ये व्यापारी अविनाश मस्के हे गाडी लावून मेडिकलवर गोळी आणण्यासाठी गेले असता अज्ञात चोरट्यांनी बोलेरो गाडीचे लॉक तोडून गाडीमध्ये ठेवलेली रोकड अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे अविनाश मस्के हे बाह्यगव्हान येथील रहिवासी असून त्यांचे बीड परळी रोडवर वडवणी येथे गणेश मशनरी चे दुकान आहे हे मस्के हे दुकान दररोज प्रमाणे बंद करून दिवसभरातील दुकानातील रोकड आपल्या बॅगमध्ये भरून घरी घेऊन

▶▶ उर्वरित पान २ वर



# पृथ्वीच्या रक्षणासाठी आणि मानवजातीच्या अस्तित्वासाठी बांबू- आधारित शाश्वत विकासाची गरज

"पृथ्वी आज अभूतपूर्व पर्यावरणीय संकटांचा सामना करत आहे. जगभरातील जंगलातील आगी व ढगफुटी यामुळे हे वातावरण बदलाचे नैसर्गिक संकट प्रत्यक्षात दिसून येत आहे. अशा परिस्थितीत राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री पर्यावरण शाश्वत विकास टास्क फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांनी बांबू हा "कल्पवृक्ष" म्हणून शाश्वत विकासाचा मार्ग सुचवला आहे. बांबूच्या अतिशीघ्र वाढीमुळे कार्बन शोषण, जंगलतोड रोखणे, आणि जैवइंधन निर्मिती शक्य आहे. 18-19 सप्टेंबर 2025 रोजी मुंबईत आंतरराष्ट्रीय बांबू परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद या संकटांना तोंड देण्यासाठी नव्या दिशा दाखवेल, या परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह तज्ञ, शास्त्रज्ञ, आणि शेतकरी सहभागी होणार आहेत."

**बांबू : शाश्वत विकासाचा कल्पवृक्ष**

हरित आच्छादन वाढवावे लागणार आहे आणि दुसऱ्या बाजूला जमिनीच्या पोटातले जीवाश्म इंधन वापरणे बंद करावे लागणार आहे. आणि हे केले नाही तर एक किलो दगडी कोळसा किंवा एक लिटर पेट्रोल जाळून निर्माण होणारे कार्बन उत्सर्जन संपण्यासाठी पुढील शंभर वर्षे देखील कमी पडतील. याला उत्तर एकच आहे की जमिनीच्या पोटा खालील डिझेल आणि पेट्रोल कोळसा वापरणे बंद करणे.

संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी जुलै 2023 मध्ये एका निवेदनात असे म्हटले होते की, "जागतिक तापमानवाढीचे युग (era of global warming) संपले आहे, आणि आता जागतिक होरपळीचे युग (era of global boiling) सुरू झाले आहे. आता तातडीच्या उपायांची गरज आहे" त्यांनी हे विधान 2023 मध्ये जगभरात झालेल्या अभूतपूर्व उष्णतेच्या लाटा, जंगलातील आगी आणि इतर हवामान-संबंधित आपत्तींच्या पार्श्वभूमीवर केले होते. 2025 पर्यंत, ही परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे, आणि तातडीच्या उपाययोजनांची गरज त्यांनी वारंवार अधोरेखित केली आहे.एक लढाई जीवाश्म इंधन ( Fossils Fuel) विरोधात जैवइंधन (Biofuel) अशी देखील आहे. त्यासाठी गंभीरपणे धोरणांची अंमलबजावणी करावी लागणार आहे.



बांबू हे अतिशीघ्र वेगाने वाढणारे गवत वर्गीय वनस्पती पीक आहे. काही प्रजाती (उदा., Dendrocalamus giganteus) दररोज 91 सें.मी. (36 इंच) पर्यंत वाढू शकतात. यामुळे बांबूला "टिम्बर ऑफ द ट्वेंटी-फर्स्ट सेंचुरी" असे संबोधले जाते. सामान्यतः बांबू 3-5 वर्षांत परिपक्व होतो, तर पारंपरिक झाडांना (उदा., साग, ओक) परिपक्व होण्यासाठी 20-50 वर्षे लागतात. बांबू हे डिझेल, पेट्रोल आणि कोळशाला पर्याय ठरणारे पीक आहे. त्याचबरोबर जंगलतोड रोखणे, ऑक्सिजनचा मुबलक पुरवठा करणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे, उष्मा कमी करणे अशा सगळ्याच वातावरण बदलाच्या संकटांना रोखणारा कल्पवृक्ष म्हणजे बांबू होय. एक ब्रीद वाक्य तयार केले आहे ते सांगते की 'Save Earth with Bamboo'.

**बांबू लागवडीसाठी शासनाचे अनुदान**

माणसाला दररोजी २८० किलो ऑक्सीजन लागतो. दिवसाला तीन फूट वाढणारा बांबू एका वर्षात 320 किलो ऑक्सीजन निर्मिती करतो आणि 35 टक्के कार्बन शोषून घेतो.

मग्रारोहयो योजनेतून महाराष्ट्र सरकार हेक्टरी 7 लाख चार हजार रुपयांचे अनुदान देत आहे. यामध्ये मजुरी आणि खड्डे खणणे तसेच रोपांचा पुरवठा करण्याच्या खर्चाचा देखील समावेश आहे.

**आंतरराष्ट्रीय बांबू परिषद : नव्या दिशेची सुरवात**

1750 मध्ये इंग्लंडच्या ग्लासगो शहरात पहिले इंजिन फिरले. हवेतला ऑक्सिजन खाऊन कार्बन वाढवत नेला, तापमान वाढवले. गेल्या 250 वर्षात इंजिन वापरून वस्तू तयार केल्या. आता याच विकासातून पृथ्वीवरचा माणूस शिल्लक राहील की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. तुम्हाला विकास हवा की प्रदूषणकारी यंत्रापासून निर्मित वस्तू? वस्तू वापरण्यासाठी माणूस देखील आवश्यक आहे. 1750 मध्ये विकासासाठी निर्माण झालेले मॉडेल आता उलटे फिरवावे लागणार आहे. हे असेच सुरू राहिले तर 2050 नंतर मानव जातीची अवस्था नरकात राहिलेले बरे पण पृथ्वीवर नको अशी होणार आहे. सावध ऐका पुढील हाका, अशी आताची परिस्थिती आहे. मानव जात वाचवण्यासाठी जीवाश्म इंधन (Fossile fuel) विरुद्ध जैवइंधन (Bio Fulel) अशी लढाई लढावी लागणार आहे. जैवइंधन निर्मितीसाठी बांबू हे चांगले शस्त्र आपल्या हाती मिळाले आहे. 14 सप्टेंबर 2025 रोजी आसाममधील नुमालीगड या ठिकाणी बांबूवर आधारित इथेनॉल निर्मितीचा प्रकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्राला अर्पण करणार आहेत. ही घटना देशाला आणि जगाला नवी दिशा दाखवण्याचा प्रयत्न आहे. म्हणूनच येत्या 18 आणि 19 सप्टेंबर 2025 रोजी आंतरराष्ट्रीय बांबू दिनाचे औचित्य साधत या सर्व गोष्टींची सांगोपांग चर्चा करण्यासाठी जगभरातील तज्ज्ञ, अभ्यासक, शास्त्रज्ञ, उद्योजक, शेतकरी आणि धोरणकर्ते यांना मुंबईमधील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात निमंत्रित करण्यात आले आहे. मानव जातीच्या अस्तित्वासाठी महत्त्वपूर्ण चर्चा आणि दोन दिवसाच्या परिषदेचे आयोजन हे फिनिक्स फाउंडेशन, लोदगा जि.लातूर आणि आणि राज्य सरकारची महाराष्ट्र सरकारच्या "महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन" (MITRA) संयुक्तपणे केले आहे. काळाची पाऊले ओळखून मानव जातीच्या रक्षणासाठी 18 आणि 19 सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या परिषदेमध्ये होणाऱ्या दोन दिवसाच्या चर्चासत्रांमध्ये बांबूपासून इथेनॉल, मिथेनॉल, थर्मल साठी बांबू पॅलेट्स, लोखंडे चारकोल, लाकूड, फर्निचर, बांबू कपडे असे अनेक उद्योग, कौशल्य, पर्यावरण, प्लास्टिक मुक्तीतून शाश्वत म्हणजेच सस्टेनेबल डेव्हलपमेंटच्या दिशेने वाटचाल अपेक्षित असणार आहे. शहरी वनीकरण (Urban Forest), ऑक्सीजन पार्क, ग्रीन बिल्डिंग अशा अनेक नवकल्पना या परिषदेतून पुढे येणार आहेत.

◆ पान ९ वरून पुढे...

## अपहरण करून...

मुलगी व आरोपींचा मागोवा लागत नव्हता. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार उमेश निकम यांनी तपास सुरू ठेवला. संशयित हर्षद बालाजी जाधवर (वय २०) याच्यावर लक्ष केंद्रित करून त्याच्या नातेवाईकांचे कॉल रेकॉर्ड तपासण्यात आले. लोकेशन तेलंगणा राज्यात आढळून आल्यानंतर फौजदार उमेश निकम, पोलीस नाईक चंद्रकांत काळकुटे, किशोर गोरे व जमादार जयश्री भालेराव यांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने खम्मम जिल्ह्यातील मोडीगोंडा येथून आरोपीला अल्पवयीन मुलीसह ताब्यात घेतले. हर्षद जाधवर याच्यावर पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पिंक पथकाचे फौजदार प्रकाश शेळके करत आहेत. दरम्यान, मुलगी बेपत्ता झाल्याने नैराश्यात गेलेल्या तिच्या पित्याने ३ सप्टेंबर रोजी दुपारी विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्यानंतर कुटुंबीयांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

## तहसीलदार यांच्या...

दाखल केलेल्या सर्व कागदपत्राची पडताळणी करून दोन्ही बाजूंचे वकिलांचा युक्तिवाद होऊन प्रकरण निकालासाठी राखीव ठेवण्यात आले, व दिनांक ४/ ९/ २०२५ रोजी न्यायनिर्णय जाहीर करून सदर वादग्रस्त

◆ पान ९ वरून पुढे...

जमीनि वरील जाधव व कुरुळे व व प्लॉट धारकांचे सातबारा वरील नोंदी कमी करून मयत गुलाबबी किशन प्रसाद यांचे नावाची नोंद घेण्याबाबत मंडळ अधिकारी व तलाठी यांना आदेश पारित केले, खऱ्या अर्थाने मयत गुलाबी किशन प्रसाद यांची नातं शेख अंजुम यांना तब्बल ७० वर्षानंतर न्याय मिळाला आहे, या वादग्रस्त जमिनीपैकी १२ एकर जमीन वरद बिल्डर्स अँड डेव्हलपर्स बीड यांनी जाधव व कुरुळे यांचे साहाय्याने प्रकरणाची खरी माहिती असताना सुद्धा १८२ लोकांना प्लॉट विक्री केलेले आहेत. या प्रकरणात अर्जदाराचे वतीने एडवोकेट सचिन एस. जायभाये यांनी भक्कम पुराव्यानिशी बाजू मांडली, अर्जदाराचा बचाव,कागदोपत्री पुरावा व युक्तिवाद ग्राह्य धरून तहसीलदार यांनी अर्जदारचा अर्ज मंजूर केला, या निकालाने बीड जिल्ह्यातील भूमाफिया यांचे धाबे दणाणले आहेत.

## बीड रेल्वे स्थानकाची...

मुख्य अभियंता (इलेक्ट्रीक) विनीत कुमार, उपमुख्य अभियंता (इलेक्ट्रीक) ज्ञानेंद्रसिंग, विभागीय अधिकारी जीतेंद्र सिंह तसेच उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यासह रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या पथकाने यावेळी संपूर्ण व्यवस्थेची पाहणी केली. हा कार्यक्रम राज्य सरकारच्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिवस उत्सव आणि माननीय पंतप्रधानांच्या संबोधित होणाऱ्या आरोग्य अभियान कार्यक्रमाचा भाग असणार आहे. रेल्वेचे महाव्यवस्थापक दरम वीर मीणा

◆ पान ९ वरून पुढे...

यांनी आगामी कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

## लग्नाबाबत वादग्रस्त...

यांनी केली आहे. याच सर्व पार्श्वभूमीवर हाके यांनी बीड जिल्ह्यातल्या गेवराई तालुक्यातील शिंगारवाडी फाटा येथे सभेचं आयोजन केले होते, या सभेत बोलताना त्यांनी मराठा समाजातील मुलींच्या लग्नाबाबत वादग्रस्त वक्तव्य केलं, या वक्तव्यानंतर हाके यांच्याविरोधात मराठा समाज चांगलाच आक्रमक झाला असून, त्यांना इशारा देण्यात आला आहे. दरम्यान हाके यांना हे वादग्रस्त वक्तव्य आता चांगलंच भोवलं आहे. मराठा समाजातील मुलींबाबत वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या लक्ष्मण हाके यांच्या विरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोपाल शिंदे यांच्या तक्रारीवरून तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वडवणीत बोलेरो...

जात असताना वडवणी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये गाडी बाजूला लावून गोळी घेण्यासाठी मेडिकल वर थांबले असता याचाच फायदा घेत चोरट्यांनी गाडीचा दरवाजा तोडून गाडीमध्ये ठेवलेली एक लाख ६५ हजार रुपयाची बॅक लंपास केली आहे. मस्के हे मेडिकल वरून

◆ पान ९ वरून पुढे...

गोळी घेऊन परत गाडीमध्ये आले असता त्यांना गाडीचा दरवाजा तोडून गाडीमध्ये ठेवलेली पैशाची बॅग दिसली नाही.या प्रकरणी अविनाश मस्के यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला असून याचा पुढील तपास वडवणी पोलीस हे करत आहेत.

## जिल्हा शिवसेना ...

धिक्कार करतो.असेच जर यापुढेही या भाजप सरकारने हुकूमशाही चालवत ठेवली तर नेपाळची पुनरावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही असे म्हणाले ,पंतप्रधान नरेंद्र मोदी हाय हाय, पाकिस्तान धार्जिणा भारत सरकारचा धिक्कार असो, शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, उद्धवसाहेब ठाकरे तुम आगे बढो अशा गगनभेदी घोषणा शिवसैनिक देत होते. यावेळी जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, माजी माजलगाव प्रमुख नामदेव सोजे, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, तालुका सचिव नंदुभाऊ येवले , तालुका संघटिका सुनिता जाधव , तालुका संघटिका कौशल्या कदम शेमशहा शेख , किर्ती पारिख ,शितल कांबळे,सुरेका डोरले , पल्लवी माळी , मंदाकिनी जाधव , कल्पना वावधाने ,कचरु जावळे ,जचंदाताई मुळे ,संगीता जंगले ,सुरैया शेख , लक्ष्मी डिस्प्ले ,सुनिता झिंगे , चंद्रकला झेंगरे ,लक्ष्मलक्ष्मी जंगले , तारामती सोनटक्के , चंद्रभागा काळे ,निता ज़गले ,दारका पट्टे कर यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक महिला आघाडीच्या कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## बीडमध्ये बंजारा ...

येथे बंजारा समाजातील तरुणांनी सुरू केलेल्या उपोषणाला खा.बजरंग सोनवणे यांनी भेट देत उपोषणकर्त्यांशी संवाद साधला होता. याच ठिकाणाहून आपण बंजारा समाजाच्या सोबत असून आपला या मागणीला पाठिंबा असल्याचेही जाहीर केले होते. यानंतर टोलमाफीसाठी पत्र देऊन सामन्य नागरिकांना टोलपासून आर्थिक झळ बसू नये यासाठी पत्र दिले आहे.

## पुरग्रस्तांच्या पाठीशी...

यांच्यासह महसूल विभागाचे कर्मचारी, संबंधित गावातील पदाधिकारी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते. अचानक झालेली अतिवृष्टी, मुसळधार पाऊस आणि पैठण येथील नाथसागरातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे गेवराई तालुक्यातील गोदाकाठावरील गावामध्ये पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी पाण्याखाली गेल्या असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी नदी काठावरील राजापूर, काठोडा, सावळेश्वर, म्हाळस पिंपळगाव, कटचिंचोली यासह गोदावरी नदीकाठच्या गावातील नुकसानीची पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश यावेळी प्रशासनाला दिले. गेवराई विधानसभा मतदारसंघात काल रात्री अतिवृष्टी झाल्यामुळे शेती आणि पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. गोदावरी नदी आणि उपनद्यांना पूर आल्यामुळे अनेक ठिकाणी विशेषतः गोदावरी नदीकाठच्या भागांमध्ये अनेक गावांचा संपर्क तुटला असून गेवराई – राक्षसभुवन रस्त्यावरील गंगावाडी नजीकच्या पुलावर अमृता नदीचे पाणी आल्यामुळे या भागातील रहदारी बंद आहे. अनेक ठिकाणी महापुराचे पाणी लोकांच्या घरात गेल्यामुळे शेतीबरोबरच घरांचेही नुकसान झालेले आहे. मागील दोन दिवसांपासून शेतात पाणी साठून राहिल्यामुळे उभ्या पिकांचेही मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे शेती, उभी पिके, पशुधन, शेतातील गोठे, शेतघर यासह वाडी, वस्त्यावरील राहती घरे यांचे अतिवृष्टी, मुसळधार पाऊस आणि महापुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे अमरसिंह पंडित यांनी प्रशासनाला निर्देश दिले. गेवराई विधानसभा मतदारसंघातील गोदाकाच्या भागांमध्ये सरासरीपेक्षा अधिकचा पाऊस अक्षरशः ढगफुटी सारखा झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. गव्हाणथडी, काळेगाव ता. माजलगाव यासह संपूर्ण गेवराई विधानसभा मतदारसंघात ज्या ज्या ठिकाणी अतिवृष्टी आणि महापुरामुळे नुकसान झालेले असेल त्या सर्व नुकसानग्रस्तांना शासनाकडून नुकसान भरपाई मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले.

## अंबासाखरच्या मील...

कारखान्याची मुहूर्त मेढ रोवली. त्याकाळी उपलब्ध असलेल्या उच्च तंत्रज्ञानानी बनवलेल्या अत्यंत चांगल्या दर्जाच्या मशनरी त्यांनी त्याकाळी बसवल्या. सलग दोन टर्म अंबासाखरचे नेतृत्व करणा–या डी. एन. पाटील यांच्या हातातुन हा कारखाना निसटला आणि पुढे या कारखान्याची ओळख बाबुराव आडसकरांचा कारखाना अशी झाली. बाबुराव आडसकर, त्यांच्या नंतर ऍड. मेघराज आडसकर आणि आता रमेश आडसकर असे एकाच घरातील तीन चेअरमन या कारखान्याला लाभले. आज या कारखान्याचे नेतृत्व चेअरमन रमेश आडसकर आणि व्हाइस चेअरमन दत्ता आबा पाटील हे करीत आहेत. ग्रामीण राजकारणात आजही साखर कारखानदारीला विशेष महत्त्व

◆ पान ४ वरून पुढे...

आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक नाडीचा थेट संबंध साखर कारखान्यांशी जोडला जात असल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एखाद्या आमदारा एवढेच महत्त्व कारखान्याच्या चेअरमनला द्यावे लागते ही वस्तुस्थिती आहे. अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना हा तसा वय झालेला कारखाना आहे. १९६९ साली या कारखान्याची उभारणी झाली आहे. त्यानंतर उभारणी झालेले मराठवाड्यातील कितीतरी साखर कारखाना आज मृतावस्थेत आहेत. अशा परिस्थितीत राज्य शासनाच्या वतीने अर्थिक सहकार्य घेत अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना चालविण्याचा धाडसी प्रयत्न रमेश आडसकर आणि व्हाइस चेअरमन दत्ता आबा पाटील हे करीत आहेत. यावर्षी ही अंबासाखरचा गळीत हंगाम सुरू करण्याचा निर्णय त्यांनी घेतला असून राजकीय परीघाच्या बाहेर जाऊन गेली अनेक वर्षांपासून असलेल्या मैत्रीचा धागा पकडत त्यांनी कारखाना सुरु करण्यासाठीचे प्रयत्न सुरु केले आहेत.अंबासाखरचा गळीत हंगाम सुरु करण्यासाठीच्या प्रत्यक्ष तयारीला तशी गेली दोन महिनाभरापासूनच सुरुवात झाली आहे. या कारखान्यातील कमकुवत अवस्थेत उभ्या असलेल्या अनेक मशनरीच्या जागेवर आज नवीन मशनरी उभ्या करण्यात आल्या आहेत. तीन ही बॉयलरचे नुतनीकरण करण्यात आले असून ऊसाचा रस, साखर होण्यापूर्वी गरम असलेला पाक नेणारी पाइपलाइन मध्ये ही अनेक ठिकाणी बदल करण्यात आले आहेत. कारखाना सुरु करण्यासाठी यावर्षी राज्य शासनाने ८० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून कारखान्याचे अत्यावश्यक देणे सारुन शिल्लक राहिलेल्या पैशातुन कारखाना दुरुस्ती चे काम सुरू करण्यात आले असून हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. अंबासाखरचा गळीत हंगाम सुरु करण्यासाठी चेअरमन रमेश आडसकर व्हाइस चेअरमन दत्ता आबा पाटील, कार्यकारी संचालक डी. एन. मरकड यांच्या मार्गदर्शनाखाली २०० कामगार रात्रंदिवस दोन पाळीत काम करीत असून कारखान्याच्या निकामी मिशनरी काढून तेथे नवीन मशनरी बसवण्याचे व काही मिशनरी नव्याने दुरुस्त करुन त्या पुर्ण क्षमतेने चालतील यांची पाहणी करण्याचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरू आहे. अंबा साखर मधील रीटन बगास कॅरीयर या यंत्रणेची सुरुवात नुकतीच व्हाइस चेअरमन दत्ता आबा पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी चेअरमन रमेश आडसकर, कार्यकारी संचालक मरकड डी. एन. , व्यवस्थापक साखरे, सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. अंबासाखरच्या मील व कॅरीयर जोडणी व इतर काम लवकरात लवकर पूर्ण करुन घेण्यासाठी चेअरमन रमेश आडसकर, व्हाइस चेअरमन दत्ता आबा पाटील, कार्यकारी संचालक मरकड हे कारखाना परीसरात तळ ठोकून असून दररोज सायंकाळी कामकाजाच्या आढावा बैठका घेऊन गळीत हंगाम दिपावली पर्यंत सुरु करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहेत. अंबासाखरचा गळीत हंगाम यावर्षी सुरु होणार असल्यामुळे या विभागातील ऊस उत्पादक शेतक–यांमध्ये व कारखाना परिसरातील छोट्या व्यावसायिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## दिंद्रुडकरांचा शिवसेनेत...

मतदारसंघातील शिवसेनेचे संघटन अधिक सक्षम व बळकट झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत असून, नव्याने सामील झालेल्या शिवसैनिकांचे स्वागत जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी मनःपूर्वक स्वागत केले.

## हैदराबाद गॅझेट ...

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, हैदराबादच्या गॅझेटीअरच्या धर्तीवर मराठवाडा सह महाराष्ट्रातील बंजारा समाजाला अनुसूचित जमाती

◆ पान ४ वरून पुढे...

प्रवर्गाचे आरक्षण विनाविलंब देण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्रातील बंजारा समाजाने रान पेटवले आहे. सर्वत्र विविध प्रकारचे आंदोलन करुन शासन प्रशासनावर प्रचंड दबाव निर्माण केला आहे. महाराष्ट्रातील बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे यासाठी मागील तीस पस्तीस वर्षांपासून वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलन करुन राज्य सरकारकडे मागणी केली गेली आहे, परंतु दुर्दैवाने सरकारने समाजाच्या न्यायिक व संविधानीक मागणीला केराची टोपली दाखवली आहे. सरकारच्या या आडमुठ्या धोरणामुळे बंजारा समाजात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. त्याचाच एक भाग म्हणून बीड जिल्ह्यातील समस्त बंजारा समाजाच्या वतीने सोमवार दिनांक १५ सप्टेंबर रोजी विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी अकरा वाजता पेठ बीड भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मोर्चाला सुरुवात होईल व जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणारआहे. तरी जिल्ह्यातील सर्व बंजारा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बंजारा समाजाची ताकद दाखवून द्यावी असे आवाहन महाराष्ट्र राज्य आश्रमशाळा संघटनेचे उपाध्यक्ष दिनेशराव पवार यांच्यासह सुशील दिनेश पवार, पांडुरंग पवार, रामभाऊ पवार, जेमा पवार, पोमा राठोड, शामा राठोड, रावसाहेब राठोड, बाबुराव पवार, प्रेमदास राठोड, मोहन राठोड, परशुराम राठोड, बाळासाहेब पवार आदींनी केले आहे.

## बीड जिल्ह्यातील...

कामे करून लिप्ट बसविण्यात आलेले आहेत व जिल्ह्यातील सर्व लिप्ट धारकांना लिप्टचे डुप्लीकेट परवाने काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी दिले आहेत.. यामध्ये लिप्ट अचानक बंद पडली व काही दुर्घटना घडली तर याला जबाबदार कोण? दि.०३/०८/२०२५ रोजी शिवाजीराव हार्ड केअर ॲण्ड इमेजिंग सेंटर बीड या हॉस्पिटलमध्ये मराठा योध्दा मा. मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्यासोबत या हॉस्पिटलच्या लिप्टमध्ये दुर्घटना घडली होती. त्यामध्ये जर लिप्टचे पूर्णपणे काम व्यवस्थित केलेले असते तर अशा होणाऱ्या लिप्टमध्ये होणाऱ्या दुर्घटना घडल्या नसत्या. शिवाजीराव हार्ड केअर ॲण्ड इमेजिंग सेंटर बीड या हॉस्पिटलचे लिप्टचे लाईसन्स नसून सुध्दा लिप्ट चालू आहे. या निष्काळजीपणाला कोणते अधिकारी व ठेकेदार जबाबदार कोण? बीड जिल्ह्यामध्ये ३०० ते ४०० लिप्ट चुकीच्या पध्दतीने अर्धवट कामे करून बसविलेले आहेत व त्यामध्ये प्रत्येक लिप्ट धारकाला कलर झेरॉक्स काढून डुप्लीकेट लाईसन्स दिले आहेत. यामध्ये हा सर्वकाही चुकीच्या पध्दतीचा पैशाचा लुटमारी कारभार या बीड जिल्ह्यातील वरीष्ठ अधिकाऱ्यांसोबत मिळून केला आहे. बीड जिल्ह्यामध्ये सरकारी ऑफीस कार्यालय, सर्व हॉस्पिटल्स, घरगुती बिल्डींस व अपार्टमेंट या जागेत ज्या काही लिप्ट बसविलेल्या आहेत. त्या प्रत्येक लिप्टची पाहणी करून व त्या प्रत्येक लिप्ट धारकाचे लायसन्स व्हेरीफाय करून ते ओरिजनल आहेत की डुप्लीकेट पाहण्यात यावेत व ज्या लिप्टधारकाचे काम अपूर्ण व लायसन्स नाहीत त्या लिप्ट तात्काळ बंद करण्यात याव्यात व बीड जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी व ठेकेदार यांच्यावर तात्काळ कार्यवाही करून या ठेकेदारांची लायसन्स रद्द करण्यात यावेत व यांच्या अर्धवट कामामुळे लिप्ट मध्ये होणाऱ्या दुर्घटना टळतील ही मा. साहेबांना नम्र विनंती सदरील मागणी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल वरपे पाटील यांनी केले आहे.

## येणाऱ्या दसरा...

दिवसाला बीड शहराला पाणी सोडले जाते मग हे कसे साहित्य हे धुवायचे

◆ पान ४ वरून पुढे...

पाण्याअभावी तसेच ठेवायचे की काय असा प्रश्न देखील माता भगिनींना बीड शहरातील पडलेला आहे शिवसागर यांची सत्ता बीडला असल्यापासून बीड शहराला पंधरा ते वीस दिवसाला पाणी मिळत आहे आणि आता सध्या नगरपालिकेचे असलेले प्रशासक साहेब यांनी या महत्त्वाच्या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ दररोज बीडकरांना पाणी सोडावे असे नागरिकांमधून बोलले जात असल्याचे मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून म्हटले आहे जर येणाऱ्या दोन दिवसात जर बीड शहराला पाणीपुरवठा जर सुरू नाही केला तर बीड नगर प्रशासनाला कुलूप ठोकले जाईल असा इशारा देखील शिराळे पाटील यांनी दिला आहे याची दखल प्रशासक ओसिओ मुख्याधिकारी नगर परिषद बीड यांनी घ्यावी असे आवाहन देखील भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे तसेच बीड शहरातील गल्लोगल्ली मध्ये सध्या अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे म्हणून येणाऱ्या हिंदूंचा महत्त्वाचा असणाऱ्या या सणाच्या निमित्ताने दिवाळी आणि दसऱ्याच्या निमित्ताने तरी बीड नगर प्रशासनाने लाईटची व्यवस्था खंब्यावर लाईट लावून करावी महत्त्वाच्या ठिकाणी शहरातील प्रत्येक गल्लीमध्ये बीड शहराचे दैवत असलेला श्री खंडेश्वरी मंदिर परिसरामध्ये देखील लाईट व्यवस्था करावी महाराष्ट्राची श्री कुलस्वामिनी तुळजाभवानी यांचे ठिकाण असलेल्या बीड शहरातील खासबाग परिसरामध्ये देवीच्या परिसरामध्ये देखील नाईट ची पाण्याची व्यवस्था करावी बीड शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी महत्त्वाच्या पोलवर लाईट बसवावे व रिपेरिंग दुरुस्ती करावी असे आव्हान देखील मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील माजी सभापती नगरपरिषद यांनी केले आहे.

## बापरे! लोकांच्या...

नकली फळं विकली जात आहेत हे समोर आलेले आहे. ज्यामुळे ग्राहकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. फळं खाल्ली पाहिजेत, असं म्हणत आपण आहारात सर्व फळांचा समावेश करण्याचा प्रयत्न करीत असतो. आपल्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून हा विचार करीत असलो तरी त्याची दुसरी बाजू गंभीर आहे. कारण– बाजारात अस्वच्छता वाढली आहे. त्यामुळे आरोग्यासाठी फायदेशीर असलेली फळं आरोग्यासाठी अपायकारक ठरत असून, ग्राहक फळं घेतात की आजार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. इथपर्यंत ठीक होतं; मात्र सध्या समोर आलेला व्हिडीओ पाहून फळं थेट झाडावरूनच आणायची का, असा सवाल उपस्थित होतोय. कारण– आता विक्रेते बाजारात बनावट फळंही विकत आहेत. नुकत्याच समोर आलेल्या व्हिडीओमध्ये केळी कृत्रिमरीत्या अवघ्या ५ मिनिटांत कशी पिकवली जाते याची प्रक्रिया दाखवणारा एक व्हिडीओ समोर आला आहे. हा व्हिडीओ पाहून तुम्ही केळी घेताना १०० वेळा विचार कराल हे नक्की या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता, लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या एका विक्रेत्याला पोलिसांनी पकडलं आहे. यावेळी तो कशाप्रकारे ग्राहकांना फसवून केळींची विक्री करतोय हे त्यालाच दाखवायला सांगितलं. यावेळी त्यानं जे दाखवलं ते पाहून तुम्हालाही धक्का बसले. आपण आरोग्यदायी म्हणून जी केळी खातोय ती आपल्या आरोग्यासाठी किती हानीकारक ठरु शकते हे या व्हिडीओमध्ये दिसत आहे. या व्हिडीओमध्ये विक्रेता दाखवत आहे, सुरुवातीला तो केमिकलने भरलेल्या बादलीमध्ये न पिकलेली केळी टाकतो पाच मिनिटं थांबा असं सांगतो आणि खरंच अवघ्या ५ मिनिटांतच हिरवी केळी पिवळी धम्मक होते. पिवळी छान पिकलेली म्हणून हीच केळी आपण विकत घेतो आणि खातो.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# खुंटेफळ साठवण तलावाच्या पाईपलाईनचे काम जलदगतीने सुरू

## जून महिन्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ होणार : आ.सुरेश धस; आ.धस यांचे आजोळात नवसपूर्ती सोहळा,पेढेतूला,मराठवाडा भूषण लोकनेते जयघोषात जंगी स्वागत

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यासाठी महत्त्वाकांक्षी असलेल्या खुंटेफळ प्रकल्पाच्या कामाला सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन ५ फेब्रुवारी २०२५ रोजी राज्याचे मुख्यमंत्री महोदय देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते या कामाचा शुभारंभ केला.. त्या दिवसापासून आत्तापर्यंत जे काम सुरू केले ते ७०% काम संपले असून पुढच्या चार महिन्यांमध्ये पुनर्वसन आणि भूसंपादन करून जून २०२६ मध्ये या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हस्ते करणार असल्याचा शब्द देत...आगामी काळात मराठवाड्याला ३० टीएमसी पाणी देण्यास तयार असल्याचे सांगत दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वा सोबत आपण राहिले पाहिजे असे



मत आ.सुरेश धस यांनी व्यक्त केले.

आष्टी विधानसभा निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी झाल्याबद्दल आ. सुरेश धस यांच्या आजोळ जन्मगाव असलेल्या आष्टी तालुक्यातील चिखली गावात शनिवारी श्री लक्ष्मीआई देवीचा नवसपुर्ती सोहळा आणि धस यांची पेढे तुला करून पुर्ण करण्यात आला. यावेळी माजी जि.प.सदस्य देविदास धस,युवानेते जयदत्त धस, जि.प.सदस्य माऊली जरांगे, गणेश शिंदे,नितीन मेहेर,राजेंद्र दहातोंडे,सभापती बद्रीनाथ जगताप, प्रल्हाद मुळीक, श्याम आबा तळेकर, बंडू तोडकर, ॲड.झांबरे, डॉ.दीपक भवर, नगराध्यक्ष जिया बेग यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.धस म्हणाले की, शेतकरी आणि दूध व्यवसाय करणाऱ्यांना दुधाचे उत्पादन वाढवणे यासाठी प्रशिक्षण आणि मार्गदर्शन शिबिर घेण्यात येणार असून प्रयोगशाळेच्या माध्यमातून देशी गाईंचे कृत्रिम रेतन करून दुग्ध व्यवसायात प्रगतीकडे नेण्याचा माझा मानस आहे. आणि त्यासाठी माझे प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत.या सह शेतीकरिता जलसिंचन सुविधा निर्माण करण्यासाठी देखील प्रयत्नशील असल्याचे धस सांगत विधानसभा निवडणुकीपूर्वी,माझे आजोळ आणि जन्मस्थळ असलेल्या चिखली गावातील श्री.विलास शिंदे व श्री.रामदास शिंदे सह चिखली ग्रामस्थांनी मी आमदार झालो पाहिजे यासाठी गावचे ग्रामदैवत श्री लक्ष्मी मातेला नवस बोलला होता.विधानसभा निवडणुकीत जर मी आमदार झालो तर देवीच्या मंदिरात माझी पेढे तूला करू असा नवस होता.


श्री.लक्ष्मीआई देवी आणि तमाम आष्टी विधानसभेतील मायबाप जनतेच्या आशीर्वादाने मी आमदार झालो.तोच नवस फेडण्यासाठी आज समस्त ग्रामस्थ, चिखली यांच्या वतीने माझी पेढे तुला करण्यात आली.याशिवाय,श्री. भगवान तांबे यांनी देवीला १०१ नारळाचे तोरण बांधले,माझे स्नेही श्री.सुनिल कुलकर्णी यांनी ग्रामस्थांसाठी भोजनाची व्यवस्था केली.

● आमदार सुरेश धस यांनी विधानसभा निवडणुकीत भरघोस मतांनी विजय मिळवल्याबद्दल जन्मभूमी आजोळ चिखली येथे नवस्फुर्ती सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला.यावेळी संपूर्ण गाव एकवटले पाहायला मिळाले तर यावेळी लेझीम पारंपारिक वाद्य वाजवत आ.धस यांचे स्वागत करण्यात आले.मराठवाडा भूषण आमदार सुरेश धस या नावाने बैल जोडी सजवलेल्या बैलगाडी, लहानग्यानी गुलाबाचे फुले देऊन आ.धस यांचे स्वागत केले. आ.सुरेश धस यांच्या वजना एवढे ११ ब्राम्हनाच्या उपस्थित विधीवत पेढेतुला करण्यात आली. आ. सुरेश धस यांनी देखील ग्रामस्थांसोबत ढोल वाजवत ठेका धरला.

● दहा वर्षांत या खुंटेफळ साठवण प्रकल्पासाठी दोन्ही माजी लोकप्रतिनिधीनी केवळ दोनच टक्के काम केले. त्यामुळे त्यांना पाण्याचे महत्व किती होते हे यावरून सर्वांच्या लक्षात आले असल्याचे सांगत आ.सुरेश धस यांनी माजी आ.भीमराव धोंडे,माजी आ.बाळासाहेब आजबे यांना नाव न घेता टोला लगावला.

● अहोरात्र सर्वसामान्यांच्या अडीअडचणीत कामाला यावं लागत सुखात दु:खात लोकांच्या सोबत रहाव लागत जनतेची नस ओळखून कामाची चुणूक दाखवावी लागते आणि जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध असावे लागते ना कुठली संस्था,ना कुठले कारखाने तरीही जनतेच्या मनातील हृदय सम्राट होता येत असल्याचे मत आ.सुरेश धस यांनी व्यक्त केले.

● अन्यायाच्या विरोधात उभा ठाकलो आणि नागपूरच्या पहिल्याच अधिवेशनात सरपंच संतोष देशमुख यांच्या झालेल्या निर्घृण हत्येला वाचा फोडत गुन्हेगारांवर कठोर शासन होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले.त्यामुळे मतदारसंघातील तमाम जनतेने आपण योग्य माणसाची निवड केल्याची भावना व्यक्त केली त्याचाच परिणाम म्हणून सबंध महाराष्ट्राला माझी एक वेगळी ओळख या माध्यमातून निर्माण झाली.



*मराठा कुणबी आरक्षणासाठी ऐतिहासिक निर्णय हैद्राबाद गॅझेट लागु करुन त्याचा सर्वांकष शासकीय अध्यादेश (GR) त्वरित काढुन त्वरित त्याची कार्यवाही सुरु करत एकहाथी खिंड लढवल्या बद्दल सकल समाजाच्या वतीने मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मा. ना. Radhakrishna Vikhe Patil यांचे पावनखिंड हे पुस्तक देऊन हार्दिक अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना इंजि. देविसिंह शिंदे, संस्थापक अध्यक्ष, जिजाऊ प्रतिष्ठान, बीड.*

# पूर परिस्थितीत प्रशासनाने सतर्क राहून काम करावे : बाळराजे पवार

**●पूरग्रस्त गव्हाणथडी गावात पोहचले बाळराजे पवार**

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई मतदारसंघात दोन दिवसापासून मुसळधार पाऊस पडत असून, गोदावरी नदीला पूर आलेला आहे. अनेक गावांना पाण्याचा वेढा पडला आहे. त्यामुळे, अशा कठीण प्रसंगातल्या परिस्थितीत प्रशासनाने सतर्क राहून काम करावे, अशी अपेक्षा युवा नेते बाळराजे पवार यांनी व्यक्त केली असून, पवार यांनी थेट मतदारसंघातील पूरग्रस्त गव्हाणथडी गावाला भेट देऊन गावकऱ्यांशी चर्चा केली. मतदारसंघातील माजलगाव तालुक्यातील गव्हाणथडी गावाला पाण्याचा वेढा पडल्यामुळे गावातील ग्रामस्थांचा



संपर्क तुटला असल्याचे समजताच बाळराजे पवार यांनी तात्काळ गावात जाऊन पूर परस्थीची पहाणी केली. यावेळेस गावातील ग्रामस्थांशी संवाद साधत धीर दिला. यावेळी बाळराजे पवार म्हणाले की , परतीचा पाऊस सुरु असून अनेक गांवाना पुर परस्थीचा सामना करावा लागत आहे. संबधित तहसीलदार व तलाठी मंडळाधिकारी यांनी सतर्क राहून पूर परस्थीचा आढावा घेऊन गोदावरी काठावरील गव्हाणथडी गावातील नागरिकांशी संपर्क साधून त्यांना आवश्यक असलेली मदत तात्काळ करण्यात यावी, अशी मागणी बाळराजे पवार यांनी केली आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघातील माजलगाव तालुक्यातील गव्हाणथडी गावाला पाण्यांचा वेढा पडलेला आहे अशी माहीती मिळतांच बाळराजे पवार यांनी गव्हाणथडी गावाला भेट देऊन परस्थीतीची पहाणी केली आहे. यावेळी लक्ष्मण लव्हाळे, चोरे, शरद मोटे, विष्णुपंत आतकरे, बाळासाहेब उबाळे, लक्ष्मण चव्हाण, श्रीराम घाटुळ आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी ग्रामस्थ म्हणाले की पूर परिस्थीती आली की आमच्या गावाचा संपर्क तुटतो आहे. कारण म्हणजे गावात येणारा रस्त्यावरील पूल एकदम खड्डयात आहे. संबधित पुल मोठा करणे आवश्यक आहे. यासाठी आपण प्रयत्न करावेत अशी मागणी ग्रामस्थांनी बाळराजे पवार यांच्याकडे केली. आपण स्वतःहा जातीने लक्ष घालून गव्हाणथडीचा पुला संदर्भात नक्कीच पाठपुरावा करू असा शब्द बाळराजे पवार यांनी गावकऱ्यांना दिला आहे.

### धाराशिव, बीडच्या संपर्कनेते पदी अंबादास दानवे



**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशावरून शिवसेना नेते अंबादास दानवे यांची बीड आणि धाराशिवच्या संपर्कनेते पदी नियक्ती करण्यात आली आहे. शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात ही माहिती देण्यात आली आहे.

# जागतिक फिजिओथेरपी दिन निमित्त मोफत कॅम्प आयोजित

## जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या वतीने 'हेल्दी एजिंग' विषयावर भर

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील माजलगाव विकास प्रतिष्ठान संचलित जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या वतीने जागतिक फिजिओथेरपी दिनाच्या निमित्ताने एक व्यापक मोफत फिजिओथेरपी कॅम्प आयोजित करण्यात येत आहे. या वर्षी जागतिक फिजिओथेरपी दिनाचा मुख्य विषय 'हेल्दी एजिंग' (निरोगी वृद्धत्व) असल्याने वरिष्ठ नागरिकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. १५ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२५ या कालावधीत आयोजित होणाऱ्या या कॅम्पमध्ये माजलगाव परिसरातील सर्व वयोगटातील रुग्ण सहभागी होऊ शकतात. कॉलेजच्या ओ.पी.डी विभागात सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ही सेवा उपलब्ध राहणार असून, अनुभवी फिजिओथेरपिस्ट आणि तज्ज्ञ डॉक्टरांची एक सुप्रशिक्षित टीम रुग्णांना दर्जेदार उपचार सेवा प्रदान करणार आहे.

फिजिओथेरपी उपचार पद्धतीमध्ये व्यायाम, मसाज, उष्णता उपचार आणि इतर आधुनिक शारीरिक तंत्रांचा वापर करून रुग्णांच्या शारीरिक क्षमतेत वाढ करण्यावर भर दिला जातो. या मोफत कॅम्पचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील लोकांना घरच्या जवळच दर्जेदार फिजिओथेरपी सेवा उपलब्ध करून देणे आणि त्यांना या उपचार पद्धतीबद्दल जागरूक करणे होय. जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, सादोळा रोड, माजलगाव येथे आयोजित या कॅम्पसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही आणि सर्व आवश्यक उपकरणे व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. अधिक माहितीसाठी इच्छुक नागरिक कॉलेजच्या प्रशासनाशी संपर्क साधू शकतात. या उपक्रमामुळे माजलगाव आणि परिसरातील अनेक रुग्णांना फायदा होण्याची अपेक्षा असून, विशेषतः वरिष्ठ नागरिकांना या संधीचा भरपूर उपयोग करावा असे आवाहन माजलगाव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष मंगलाताई सोळंके यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीड जिल्ह्यात महिला सन्मान फक्त कागदावरच का?

## जिल्हाधिकारी व आमदारांच्या बैठकीत महिलाचे पदे पुरुषांच्या ताब्यात सावता सेना महिला आघाडीच्या वतीने जाहीर निषेध

**पाटोदा । प्रतिनिधी**

महिलांसाठी आरक्षण म्हणजे सन्मान, सहभाग आणि नेतृत्वाची खरी संधी. मात्र बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या आष्टी, पाटोदा, शिरुर मतदार संघाच्या विविध विकास कामाच्या बैठकीतच या आरक्षणाचा थेट अपमान झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. आष्टी नगराध्यक्षा यांच्या जागी त्यांचा मुलगा, तर पाटोदा व शिरुर नगराध्यक्षांच्या जागी पत्नीऐवजी थेट पती बैठकीत विराजमान झाले. महिला प्रतिनिधींच्या नावावर खुर्ची जिंकूनही प्रत्यक्षात पुरुषच कारभार हाकत असल्याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. हा प्रकार नेमका लोकशाहीचा अपमान नाही तर काय? असा प्रश्न सावता सेना महिला आघाडीने उपस्थित केला आहे.सावता सेना महिला आघाडीच्या बीड जिल्हाध्यक्षा स्वाती कातखडे व सावता सेना महिला आघाडी आष्टी तालुका अध्यक्षा वर्षा शिंदे यांनी या प्रकारावर तिखट शब्दांत हल्लाबोल केला. महिला आरक्षणाची जागा



मिळते तेव्हा आनंदाने टाळ्या वाजवतात, पण कारभार मात्र पुरुषांच्या हाती सोपवला जातो. मग महिला राजकारणात केवळ नावापुरत्या का? महिलांना खुर्ची केवळ 'आरक्षणाची सोय' म्हणून देण्यात येते, खरी सत्ता मात्र घरातील पुरुषांना देण्याचा हा प्रकार महिलांच्या सन्मानाचा उघड उघड अपमान आहे, असे कडाडून मत त्यांनी व्यक्त केले. त्या पुढे म्हणाल्या, जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली. आमदार,अधिकारी आणि कर्मचारी सगळ्यांच्या डोळ्यांसमोर महिलांच्या जागी पुरुष बसलेले असताना कुणी आवाज का उठवला नाही? याचा अर्थ सत्ताधाऱ्यांच्या गप्प राहण्याला मूक संमती म्हणायचं का? व बीड जिल्हात महिला राज केवळ कागदावरच का?

महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी रोखठोक सवाल केला की, महिला सशक्तीकरण हे केवळ भाषणापुरतेच आहे का? महिला आरक्षणाच्या नावाखाली खुर्ची मात्र घरातील पुरुषांना देणे, ही थेट लोकशाहीची पायमल्ली आहे. जर महिलांनीच स्वतः पुढे येऊन निर्णय घेतले नाहीत, तर आरक्षणाचा खरा हेतू हरवेलला आहे या संपूर्ण प्रकारामुळे सावता सेनेच्या वतीने संताप व्यक्त होत आहे. बैठकीतच महिलांचा अपमान होत असेल तर गावागावातील महिला राजकारणी, कार्यकर्त्या आणि सामान्य महिलांचा आत्मविश्वास नेमका कुठे टिकणार? असा सवाल जनतेतूनही केला जात आहे.महिला आरक्षण म्हणजे महिलांच्या हाती सत्ता, की पुरुषांच्या हातातली बाहुली?हा सवाल सावता सेनेने उपस्थित करून प्रशासन, आमदार आणि राजकीय पक्षांना जबाबदार धरले आहे.

# शालेय जिल्हास्तरीय की बॉक्सिंग स्पर्धा उत्साहामध्ये संपन्न झाल्या

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा जिल्हा परिषद बीड व जिल्हा क्रीडा कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने व बीड जिल्हा किक बॉक्सिंग असोसिएशन यांच्या सहकार्याने दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल बीड बॅडमिंटन हॉल या ठिकाणी जिल्हास्तरीय स्पर्धा घेण्यात आल्या.

या स्पर्धेसाठी आपल्या गटामध्ये प्रथम क्रमांक मिळून विभागीय स्पर्धेकरिता निवड झाली १४ वर्षाखालील मुले कृष्णा श्याम भुतडा वजन घट ५२ किलो खाली प्रथम क्रमांक , चव्हाण आर्यन२८किली (प्रथम) , चव्हाण शुभम ३२किलो( प्रथम) , चव्हाण सार्थक३७ ( प्रथम) , चव्हाण संकेत४२किलो, १७ वर्षा आतील मुली, ४० किलो, १. पवार ज्योती (प्रथम) , ४५ किलो, १. घाडगे



भक्ती (प्रथम) , १७ वर्षा आतील मुले, ५० किलो, ज्योतीराम जगदाळे ५५ किलो प्रथम, देवांग शिंदे ६० किलो, प्रथम, उमर बागवान ७० किलो वजनाखाली प्रथम क्रमांक , वरील सर्व खेळाडूंनी प्रथम क्रमांक विभागीय स्पर्धेकरिता आपले स्थान निश्चित केले आहे. द्वितीय क्रमांक यश सरपदे, प्रेम जोगदंड, प्रतीक कोटेकर गोविंद कुलकर्णी, रितेश पाबळे , प्रांजल सपाटे, स्पर्शिका सपाटे , सुर वडमारे , या स्पर्धेकरिता बीड जिल्हा व शहर किक बॉक्सिंग असोसिएशन यांच्या सहकार्याने व छत्रपती संभाजी नगर या ठिकाणाहून पंच म्हणून प्रथमेश राजपूत, देव चालक, दत्तात्रय शिंदे, उत्कर्ष सोपलकर या लोकांनी पंच म्हणून काम पाहिले तसेच राष्ट्रीय खेळाडू पवन जोगदंड विनायक जगताप यांनी सहकार्य केले वरील स्पर्धेच्या उद्धाटनाकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यालय सर , तालुका क्रीडा अधिकारी , रेवनाथ शेलार तालुका क्रीडा अधिकारी बीड जिल्हा सचिव व प्रशिक्षक उत्तेश्वर सपाटे , मोसिन शेख , गेवराई राम निमटे केज उपस्थित होते स्पर्धा संपन्न झाल्या जालना या ठिकाणी होणारे विभागीय स्पर्धे करिता वरील सर्व खेळाडूंना क्रीडा अधिकारी सर अरविंद विद्यागर सर रेवनाथ शेलार, जितू सर खेळाडूंना पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या वरील खेळाडू आपल्या जिल्ह्याचे विभागीय स्पर्धेवरती नाव गाजवतील अशी ग्वाही प्रशिक्षक व सचिव उत्तरेश्वर सपाटे यांनी दिली

# विद्यापीठ बीड जिल्हा युवा महोत्सव वाद-विवाद स्पर्धेत वसंतराव काळे पत्रकारिता महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने बीड जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२५ र.भ. अट्टल महाविद्यालय गेवराई येथे नुकताच पार पडला. या युवा महोत्सवामध्ये वसंतराव काळे पत्रकारिता आणि संगणकशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वाद-विवाद स्पर्धेत द्वितीय पारितोषिक मिळवल्याबद्दल संस्थाअध्यक्ष रमेश भाऊ पोकळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आणि विद्यापीठ स्तरावर होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

येथील वसंतराव काळे पत्रकारिता व संगणकशास्त्र महाविद्यालय बीड या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर बीड जिल्हा युवा महोत्सवातील वाद-विवाद स्पर्धेत विद्यार्थी समर्थ सिद्धलिंग गावडे आणि बालाजी



उत्तरेश्वर सराटे यांनी उल्लेखनीय कामगिरी करत सांघिक द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

या स्पर्धेत संघ संचालक म्हणून वसंतराव काळे पत्रकारिता महाविद्यालयाचे प्रा. सुहास गाढवे यांनी विद्यार्थ्यांच्या सोबत उपस्थित राहून त्यांचे मनोबल वाढवण्याचे काम केले. या स्पर्धेसाठी प्रा. बप्पासाहेब हावळे सरांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले असल्यामुळे त्यांच्या कामगिरीत अधिक चमक आली.

यावेळी प्रशासकीय अधिकारी प्रा. बप्पासाहेब हावळे,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रा. रफिक सय्यद आणि कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेनंतर समर्थ गावडे व बालाजी सराटे या विद्यार्थ्यांची विद्यापीठ विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यावेळी प्रा. महेश नेवडे,प्रा. कोमल सुरवसे, प्रा.अतुल रसाळ, प्रा.अफरोज सय्यद, सौ. पोकळे, सौ.प्रिती सुरवसे, खराडे, सचिन चौरे उपस्थित होते.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०२५ • पान ४

## थोडक्यात...

### बापरे! लोकांच्या जीवाशी खेळ; बाजारातून केळी विकत घेताना सावधान, जाऊ शकतो जीव



**बीड । प्रतिनिधी**

आरोग्यदायी खा आणि निरोगी राहा असा सल्ला सगळेच देतात मात्र हेच आरोग्यदायी खाणं कुठे मिळतं असा प्रश्न सध्या सगळ्याच गृहिणींना पडतो. त्याच कारणं असं की आता बाजारात असा कोणताच पदार्थ राहिलेला नाही ज्यात भेसळ नाही. अगदी फळं आणि भाजी पाल्यातही मोठ्या प्रमाणात भेसळ होताना दिसते. बाजारातून फळं विकत घेताना आपल्याला आरोग्यदायी आणि फळं मिळतील, असा आपला विश्वास असतो. मात्र, एका धक्कादायक व्हिडीओमुळे हा विश्वास पुन्हा डळमळीत झाला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडीओत कृत्रिमरीत्या तयार करण्यात आलेल्या केळीचा दाखवण्यात आला आहे. यामुळे बाजारात सहजपणे ▶▶ उर्वरित पान २ वर

### येणाऱ्या दसरा व दिवाळीच्या निमित्ताने तरी बीड नगर प्रशासनानी तात्काळ दखल घेऊन स्वच्छता व वीज पाणी व रस्त्याची व्यवस्था करणे गरजेचे नवनाथ अण्णा शिराळे पाटील



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरांमध्ये सध्या जागोजागी रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरिकांना चालताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे खड्ड्यात रस्ता आहे की रस्त्यात खड्डे आहेत हेच समजत नाही आणि सध्या बीड शहराच्या जवळ असलेले बिंदुसरा प्रकल्प व सांडून वाहत असताना देखील बीड शहराला पंधरा ते वीस दिवसाला पाणी सोडले जाते हे दुर्दैव बिड करायचे आहे की काय असे देखील बीड शहरातील नागरिकांम धून संतापताची लाट सध्या व्यक्त होत आहे तोंडावरच दसरा व दिवाळी येऊन ठेपलेली आहे सध्या पितृ पक्ष पंधरवाडा चालू असून महिला भगिनी घरातील भांडे धूने कपडे दसऱ्यानिमित्त धुण्यासाठी काढत असतात तसेच घरोघरी रंग रगोटी देखील केली जाते परंतु पाण्याअभावी ही कशी रंगरंगोटी करावी कसे धुणे धुवावे कसे भांडे मोठे धुने करावे कसे मोठे मोठे टेबल बाकडे खुर्च्या घरातील सर्वच साहित्य पंखा सह सर्व साहित्य धुण्यासाठी पाणी लागते परंतु १५ ते २० ▶▶ उर्वरित पान २ वर

### कऱ्हेवडगावचे माजी सरपंच उत्तम नागरगोजे यांचे वृद्धापकाळाने निधन



**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कऱ्हेवडगाव येथील जुन्या पिढीतील नावलौकिक पैलवान उत्तम भोंजीबा नागरगोजे यांची शनिवार दि. १३रोजी सकाळी वृद्धापकाळाने प्राणज्योत मालवली. वयाच्या ९०व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. उत्तम भोंजीबा नागरगोजे यांना लहानपणापासूनच व्यायामाची आवड असल्याने जोर बैठका काढून शरीर पिळदार केले होते. जुन्या पिढीत नावलौकिक पैलवान म्हणून संपूर्ण आष्टी तालुक्यात त्यांची ओळख होती. त्यांनी कऱ्हेवडगावचे सरपंच पद सलग पंधरा वर्षे भूषवले होते. आदर्श गाव कारभारी म्हणून त्यांची पंचक्रोशीत ओळख होती. त्यांना एक मुलगा असुन पोलीस विभागात सेवेत असल्याने ते अंबाजोगाई येथे स्थायिक आहेत. शनिवार दिनांक १३ रोजी सकाळी त्यांनी अंबाजोगाई येथील राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. दुपारी दोन वाजता कऱ्हेवडगाव येथील शेतामध्ये त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# नागलवाडीची समस्या क्षणात मार्गी

## पंकजाताईंच्या धडाडीला गावकऱ्यांचा सलाम : गणेश लांडे

**बीड । प्रतिनिधी**

सर्वसामान्यांच्या हाकेला तात्काळ प्रतिसाद देत सम स्या मार्गी लावण्याची क्षमता पंकजाताई मुंडे यांच्यात आहे. त्यामुळेच त्या खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे नेतृत्व करतात, असे प्रतिपादन भाजप बीड जिल्हा सरचिटणीस श्री. गणेश लांडे यांनी केले. शेवगाव तालुक्यातील डोंगरमाथ्यावर वसलेले नागळवाडी गाव विकासापासून वंचित राहिले होते. गावातील स्मशानभूमीत साधे शेड नव्हते, तसेच तेथे जाण्यासाठी रस्ताही नसल्याने विशेषतः पावसाळ्यात अंत्यसंस्कार करताना गावकऱ्यांना व नातेवाईकांना प्रचंड हाल सोसावे लागत.

या समस्येमुळे त्रस्त झालेल्या एका युवकाने थेट पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना म



ोबाईलवर संदेश पाठवून आपली व्यथा मांडली. पंकजाताईंनी तातडीने संबंधित युवकाला संपर्क करून समस्या जाणून घेतली व ताबडतोब आपल्या आमदार निधीतून स्मशानभूमी विकासासाठी निधी मंजूर केला. यासंदर्भात प्रशासनाला तात्काळ सूचना देऊन काही क्षणांतच नागळवाडीची समस्या मार्गी लावली. या धडाडीच्या निर्णयामुळे गावकऱ्यांनी पंकजाताईंचे मनःपूर्वक आभार मानले.

पंकजाताईंसमोर समस्या मांडली की तिचे निराकरण विलंब न लावता केले जाते, हा सर्वांचा अनुभव आहे. त्यामुळे पंकजाताई मुंडे या सर्वसामान्यांच्या मनात लोकप्रिय नेतृत्व म्हणून वारंवार सिद्ध होत आहेत, असे श्री. गणेश लांडे यांनी स्पष्ट केले.

## बीडमध्ये बंजारा समाजाच्या मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी द्या : खा.बजरंग सोनवणे यांचे संबंधित विभागाला पत्र

**बीड । प्रतिनिधी**

बंजारा (लमाण) सम ाजाच्यावतीने बीड येथे दि.१५ रोजी विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चासाठी येणाऱ्या बांधवांच्या येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांना टोल माफी देण्यात यावी, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी,राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मुंबई, यांना



दिले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे, राज्य शासनाने दि. २ सप्टेंबर २०२५ रोजीचा शासन निर्णयानुसार हैदराबाद स्टेट गॅझेटियर स्वीकारले असून, त्या गॅझेटरमधील नोंदीनुसार बंजारा (लमाण) सम ाज अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात मोडतो. मराठवाडयातील विशेषतः तत्कालीन हैदराबाद राज्याच्या भागातील बंजारा समाजाच्या मागणीसाठी बीड जिल्हयातील संपूर्ण बंजारा समाज बांधवांनी दि. १५ सप्टेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय, बोड येथे भव्य विराट मोर्चा आयोजित केला आहे. या मोर्चामध्ये समाज बांधव मोठ्या संख्येने आपल्या वैयक्तिक व व्यावसायिक वाहनाने सहभागी होत आहेत. यामुळे मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी देने आवश्यक आहे. या निर्णयामुळे जनतेला आर्थिक दिलासा मिळेल, टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक सुलभ होईल . बीडकडे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्याच्या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत. असेही त्यांनी पत्रात म्हटले आहे. दोन दिवसापूर्वी बीड ▶▶ उर्वरित पान २ वर

## सुनीलभाऊ साळवे यांच्या कुटुंबावर प्राणघातक हल्ला

### बीड जिल्ह्यात संतापाची लाट! पाटोदा तहसीलवर सोमवारी सर्वपक्षीय निदर्शने

**पाटोदा । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) जिल्हाध्यक्ष सुनीलभाऊ साळवे यांच्या कुटुंबावर नान्नज (ता. जामखेड) येथे झालेल्या प्राणघातक हल्ल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. समाज बांधवांमध्ये भीषण संताप पसरला असून, हल्लेखोरांना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा व्हावी, यासाठी सर्वपक्षीय पातळीवर तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.या निषेधार्थ पाटोदा तहसील कार्यालयावर सोमवारी दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता भव्य सर्वपक्षीय निदर्शने होणार आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून न्यायाच्या लढ्यात खांदा द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पुरग्रस्तांच्या पाठीशी 'शिवछत्र' परिवार खंबीरपणे उभा आहे : अमरसिंह पंडित

## पूरग्रस्त भागाची आ. विजयसिंह पंडित आणि अमरसिंह पंडित यांनी केली पाहणी करून दिला धीर

**गेवराई । प्रतिनिधी**

सरासरी पेक्षा अधिक झालेला पाऊस आणि नाथसागरातून गोदावरी पात्रात १ लाख १३ हजार क्युसेस पाणी सोडल्याने गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या गावांमध्ये पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित



यांन पूरग्रस्त भागाची पाहणी करून शेतकरी व नागरिकांना धीर दिला. पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शासकीय मदत मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. काळजी करू नका शिवछत्र परिवार तुमच्या पाठीशी आहे,अशी ग्वाही त्यांनी यावेळी देऊन प्रशासकीय अधिकाऱ्यांना सुचना केल्या, यावेळी तहसीलदार संदीप खोमणे, भाऊसाहेब नाटकर ▶▶ उर्वरित पान २ वर




## अंबासाखरच्या मील व कॅरीयर जोडणीचे काम अंतिम टप्प्यात ; दिपावली पर्यंत गळीत हंगामास होणार सुरुवात

### रमेश आडसकर व दत्ता आबा पाटील यांची माहिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या मील व कॅरीयर जोडणीचे काम अंतिम टप्प्यात आले असून यावर्षीचा गळीत हंगाम दिपावली पर्यन्त सुरु करण्यात येणार असल्याची माहिती अंबासाखरचे चेअरमन रमेश आडसकर व व्हाइस चेअरमन दत्ता आबा पाटील यांनी दिली. बीड जिल्ह्यात सर्वात



जुना म्हणून ओळखला जाणा-या अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगाम याही वर्षी जोरदारपणे सुरू करण्यासाठी चेअरमन रमेश आडसकर, व्हाइस चेअरमन दत्ता आबा पाटील यांनी शड्डू ठोकला असून राजकारणाच्या परीघाबाहेर जावून मैत्रीच्या संबंधाचा धागा पकडत हे दोघेही अंबासाखरच्या पुर्व उभारणीसाठी रात्रंदिवस प्रयत्न करीत आहेत. अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना हा मराठवाड्यातील सर्वात जुना कारखाना म्हणून ओळखल्या जातो. १९६९ साली या विभागातील सहकार महर्षी डी. एन. पाटील साहेब यांनी या ▶▶ उर्वरित पान २ वर

## दिंद्रुडकरांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश; माजलगाव मतदारसंघात संघटन बळकट!

**बीड । प्रतिनिधी**

हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारधारेने प्रेरित होऊन तसेच उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख मा. एकनाथजी शिंदे आणि खासदार श्रीकांतजी शिंदे यांच्या विकासाभिमुख कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत माजलगाव विधानसभा म तदारसंघातील दिंद्रुड गावातील अनेक कार्यकर्त्यांनी काल दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी



१२.०० वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथे जाहीर प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्यात दीपक चोरघडे, पृथ्वीराज ठोंबरे, गणेश मायकर, श्याम शेजुळ, व्यंकट ठोंबरे, सतीश देवकर, महादेव कांबळे आणि ज्ञानेश्वर कटारे यांचा समावेश होता. हा प्रवेश शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्निल भैय्या गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर (माऊली) गोंडे, रामदास ढगे, संदीप माने, शिवाजी गोंडे, मसुराम गोंडे यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिंद्रुड गावातील या कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे माजलगाव ▶▶ उर्वरित पान २ वर

### हैदराबाद गॅझेट नुसार एस.टी. प्रवर्गाच्या मागणीसाठी बंजारा समाजाच्या विराट मोर्चात सहभागी व्हा: दिनेशराव पवार



**बीड । प्रतिनिधी**

ज्या हैदराबाद गॅझेटचा आधार घेत मराठा समाजाला कुणबीचे आरक्षण दिले, त्याच गॅझेटचा आधार घेऊन आम्हा भटक्या विमुक्त बंजारा समाजास आदिवासी एस.टी. प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी आज सोमवार दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर बंजारा समाजाचा विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. आपल्या हिताच्या मागणीसाठी, लेकरा-बाळांच्या कल्याणासाठी व उज्ज्वल भविष्यासाठी बंजार समाज बांधवांनी बहुसंख्येने या मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य आश्रमशाळा संघटनेचे उपाध्यक्ष दिनेशराव पवार यांनी केले आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यातील गैर कानुनी व चुकीच्या पध्दतीने ३०० ते ४०० लिप्ट बेकायदेशीर

## ठेकेदार व बीड जिल्ह्यतील काही वरिष्ठ अधिकारी यांची पूर्णपणे चौकशी करून यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करा : स्वप्निल वरपे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गैर कानुनी व चुकीच्या पध्दतीने ३०० ते ४०० लिप्ट बसविण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये १५ ते २० ठेकेदार व बीड जिल्ह्यतील काही वरिष्ठ अधिकारी यांची पूर्णपणे चौकशी करून यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करून ज्या विना परवान्याच्या लिप्ट बीड जिल्ह्यात चालू आहेत; त्या तात्काळ सिल करण्यात याव्यात व त्या ठेकेदारांचे लायसन्स रद्द करणे बाबत. स्वप्नील वरपे पाटील या सामाजिक कार्यकर्ते यांनी निवेदन दिले आहे. उपरोक्त विषयी आपणास सविनय अर्ज करण्यात येतो की, बीड जिल्ह्यातील गैर कानुनी ३०० ते ४०० लिप्टचे चुकीच्या पध्दतीने बसविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये काही लिप्टला एमरजन्सी रिस्की डिव्हाईस बसविलेले नाहीत. रिस्की डिव्हाईसचे काम लाईट गेल्यानंतर लिप्ट एका फ्लोअरला सोडते. लिप्टच्या वर सेप्टी बॅरिकेट बसविलेले नाहीत. मोटरला एमरजंन्सी ब्रेक बसविलेले नाहीत. एमरजंन्सी ब्रेकचे काम लिप्ट अडकल्याच्या नंतर त्याचा वापर केला जातो. लिप्टला चक्कर प्लेट बसविलेली नाही. लिप्टच्या चक्कर प्लेटचे काम सेप्टी नाही. लिप्टला खड्यामध्ये जी सेप्टी असते ते बफर स्प्रिंग बसविलेली नाही. बीड जिल्ह्यातील देखभाल दुरूस्तीचे रेकॉर्ड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नाही. नवीन लिप्टला परवानगी देण्याची जागेवर जाऊन वार्षिक तपासणी करण्याची जबाबदारी ऊर्जा विभागाच्या अंतर्गत असते. परंतु बीड मधील कोर्ट तसेच हॉस्पिटल जिल्ह्यातील सरकारी ऑफीस, कार्यालय, घरगुती बिल्डींग्स, अपार्टमेंट बीड मधील या सर्व जागेत चुकीच्या पध्दतीने लिप्टचे अर्धवट ▶▶ उर्वरित पान २ वर